# प्रकरण - पाचवे

[ समारोप ]

# स मा रो प

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर इ.स. १६८१ मध्ये मराठयांचे राज्य उध्वस्त करण्यासाठी औरंगजेब बादशहा दक्षिणेत उतरला होता. मराठयांशी सामना करीत असतानाच अत्यंत निराश अवस्थेत इ.स. १७०७ मध्ये मृत्यू पावला यावेळी मोगलांच्या कैदेत असणा-या शाहू महाराजांची सुटका झाली आणि मराठयांच्यामध्ये गादीबद्दल भांडण जुंपले. यातून शेवटी मराठी राज्याची दोन शकले पडली. सातारा हे ठिकाण शाहूने काबीज केले आणि ताराबाईने कोल्हापूरमध्ये नवीन राज्याची स्थापना केली. ताराबाईने स्थापन केलेल्या कोल्हापूरच्या गादीवर इ.स. १७६० पर्यंत दोन छत्रपतींनी राज्यकारभाराची धूरा संभाळली पैकी पहिले छत्रपती ताराबाईचे पुत्र शिवाजी व दुसरे छत्रपती ताराबाईचे सावत्र पुत्र संभाजी हे होत. संभाजीच्या मृत्यूनंतर शिवाजी दुसरे यांनी कोल्हापूर राज्याची धूरा संभाळली.

इ.स. १७६१ च्या पानिपत युध्दात मराठयांचा प्रचंड पराभव झाला होता. त्यामुळे मराठी राज्य सावरण्याचे प्रयत्न जसे पेशव्यांनी केले त्याचप्रमाणे करवीरचे राज्य स्वतंत्रपणे टिकविण्याचे धोरण ताराबाई पासून दुस-या शिवाजीच्या काळापर्यंत कायम स्वरूपाचे होते. हे लक्षात येते. छत्रपती शिवाजी [दुसरे] हे कोल्हापूर संस्थानचे पहिले दत्तकपुत्र होते.

करवीर राज्यात संभाजी महारांजाच्या मृत्यूनंतर दत्तकाचा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

प्रश्न निर्माण झाला होता. नानासाहेबांनी तर करवीर राज्य जप्त करण्याचा घाट घातला होता. परंतु थोरल्या माधवराव पेशव्यांनी दत्तकविधानावेळी दाखविलेला धूर्तपणा पुढील पेशव्याकडून दाखविला गेला नाही. म्हणून पेशवे व छत्रपती यांची राज्ये कोलमडली. बारभाईच्या राजकारणात सरदारांचे महत्व प्रभावित झाल्यामुळे पेशवे सत्ताहीन झाले. त्यांनी करवीरच्या राजकारणात हस्तक्षेप करून दक्खनमधील राजकीय परिस्थितीत गोंधळ माजविले. परंतु त्याला छत्रपतींनी शेवटपर्यंत समर्थपणे तोंड दिले. या स्वकीय राज्यकर्त्यांच्या कारभारात इंग्रजांनी मध्यस्थी करण्यास जेंव्हा सुरूवात केली तेव्हा दोन्ही सत्ता इंग्रजापुढे असमर्थ ठरल्या आणि त्याचा शेवट मराठी राज्य खालसा होण्यात झाला.

शिवाजी [दुसरे] यांच्या कालखंडात स्वातंत्र्य व स्वराज्यरक्षण हे कठीण काम पार पाडावे लागले. कोल्हापूर राज्यावर आलेल्या संकटांना शिवाजी महाराज यांनी त्यावर यशस्वी मात केली. १८०० सालापर्यंत पेशव्यांनी राज्याभोवती बरीच वर्षे वेढा घालून छत्रपतींना नामोहरण करण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण अशा संकटांनी ते नष्ठ न होता त्यावर मात करून त्यांनी आपले अस्तित्व टिकवून धरले.

पेशव्यांनी साताराच्या छत्रपतीप्रमाणे कोल्हापूर छत्रपतींशी सलोख्याचे संबंध ठेवले असते तर करवीर छत्रपती आणि त्यांचे सरदार इत्यादींना दक्षिणेत मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापीत झाले होते ते वाढीस लावणे शक्य झाले असते.

छत्रपती आणि सरदार एकमेकांशी एकनिष्ठ होते. त्यामुळे तत्कालीन अस्थिर परिस्थितीतून कोल्हापूर संस्थान अर्धशतक पावेतो

टिकले, हाच राज्याच्या स्थिरतेचा सबळ पुरावा होय. कारण पेशवे, इचलकरंजीकर, सावंतवाडीकर आणि निपाणीकर असे कोल्हापूर संस्थानचे शत्रू असताना चारी बाजूनी करवीरकरांना घेरले होते. तशातच इंग्रज, पोर्तुगीज या परकीय सत्तांची भर पडली होती अशा प्राप्त परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजानी उपलब्ध असलेल्या फौजफाटयासह स्वातंत्र्य-युध्दात उडी घेतली आणि दक्षिणेचे राजकारण बदलून टाकले.

१७१० ते १८२० या एकशे दहा वर्षाच्या कालखंडात कोल्हापूर संस्थानमध्ये चार राज्याच्या कारकिर्दी झाल्या. त्यामध्ये पहिले शिवाजी, पहिले संभाजी, दुसरे शिवाजी आणि दुसरे संभाजी. या प्रत्येक कारकिर्दीची स्वत:ची अशी वैशिष्ठये होती. पेशवे व छत्रपती पराक्रमात कमी नव्हते. परंतु राज्यातील सरदारांच्या फितुरीमुळे राज्यपध्दती डळमळीत झाल्या. पेशव्यांना आपण हिंदुस्थानचे प्रशासक आहोत असे वाटत असतांना करवीर छत्रपतींनी आपले राज्य शेवटपर्यंत स्वतंत्र ठेवले.

कोल्हापूर संस्थानची संस्थापिका महाराणी ताराबाईहीच्या मुलाची [शिवाजी] यांची कारकिर्द दुर्दैवी झाली. या कारकिर्दीचा अंत छत्रपती पहिले संभाजी यांनी त्यास बाजूस सारून झाला. याच वृत्तीला कोल्हापूरच्या इतिहासात रक्तहिन राज्यक्रांती असे म्हटले जाते. पहिल्या शिवाजीच्या कारकिर्दीनंतर संभाजी [पहिले] यांचा कालखंड [१७१४-१७६०] हा होय. परंतु यांची कारकिर्दही सातारचे थोरले शाहू महाराज यांच्या कारकिर्दीपुढे प्रभावीत होऊ शकली नाही कारण शाहू महाराजांनी मराठे सरदार आपल्या बाजूस वळवून घेतले व सर्व कारभार पेशव्याच्या ताब्यात

दिला पेशव्याचाच काळात पानिपतची तिसरी लढाई होऊन त्यात मराठेशाहीस पराभव पत्करावा लागला. अशाच स्थितीत कोल्हापूरचे स्वतंत्र संस्थान एक करण्याचा प्रयत्न पेशव्यांनी केला तथापि त्यांच्या ह्या प्रयत्नाला करवीरच्या जिजाबाईंनी यश येऊ दिले नाही व शेवटी आपल्या मर्जीतीलच जिजाबाईंनी घेतलेला दत्तकपुत्र यास मान्यता द्यावी लागली, ही सत्य गोष्ट होती.

इ.स. १७१३ ते १८१८ हा पेशव्यांच्या राज्यकारभाराचा प्रदीर्घ कालखंड होय. या एकशेपाच वर्षांच्या काळात केवळ राजकारणाची सुत्रे छत्रपतीकडून पेशवे व पेशव्यांकडून महादजी शिंदे व नाना फडणीस या सारख्या सरदाराकडे गेली. याउलट कोल्हापूर राज्याच्या नेतृत्वात तीन वेळा बदल झाला. प्रथम पहिले संभाजी यांचा कालखंड [१७१४ ते १७६०] व त्यानंतर दुसरे शिवाजी यांचा कालखंड [१८१३ ते १८२१] यांच्या नेतृत्वाखाली मराठे लढले. लष्करी संघर्षातील चिवटपणा, जिद्द, शौर्य इ. गुण उभय बाजूंच्या नेतृत्वाने दाखविले ज्या जिद्दीने पेशवे लढले त्याच जिद्दीने छत्रपती लढले. पेशवे आणि छत्रपती यांच्यातील प्रामुख्याने लष्करी स्वरूपाचा संघर्ष होता. त्यामुळे कर्नाटकातून छत्रपती परत करवीरी येत असता निपाणीकरांनी इंग्रजांची मदत घेऊन विश्वासघाताने छत्रपतीवर हल्ला केल्याचे आढळून येते. वास्तविक निपाणीकर छत्रपतींचे नातलग असतानासुध्दा ही घटना घडावी, हा केवळ दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे.

सतत पंचवीस वर्ष चाललेल्या या लष्करी संघर्षाने करवीर राज्यात पराक्रमी पुरुषांची एक पिढीच निर्माण झाली, उदाजीराव घाटगे, प्रीतीराव चव्हाण, कित्तूरकर देसाई, खंडेरावभोसले, विश्वासराव, हैबतराव, गुजाजीराव, राजाकरपंत भगवंतराव प्रतिनिधी, राणोजी घोरपडे, सखाराम घाटगे, धोंडजी वाघ, सखाजी भोसले, मानाजी फाकडे, महादेवशास्त्री फोंडेकर असे कित्येक वीर या युध्दातून तावून-सुलाखून पुढे आले. हिंदुस्थानचे राज्यकर्ते असलेल्या पेशव्यांना एका राजाशी अगर राजघराण्याशी लढण्याची पाळी आली. एका बाजूला आक्रमक वृत्तीचा कोल्हापूर राज्य जप्त करण्याचा पेशव्यांचा कुटिल डाव आणि दुसरीकडे कोल्हापूर राज्याची स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी सरंक्षक प्रवृत्ती असे या संघर्षाचे स्वरुप होते.

छत्रपतींची राज्यपध्दती थोरल्या शिवाजी प्रमाणेच होती. अष्टप्रधान पध्दत, स्वामीनिष्ठ सेवक पराक्रमाने मिळविलेले किताब, हिंदूधर्म परंपरेप्रमाणे संस्कार, आर्थिक प्रगतीकडे दुर्लक्ष असल्यामुळे लढाया, खंडण्या वसूल करणे यावर राज्य चालत होते.

एकोणीसाव्या शतकात हिंदुस्थानमध्ये इतर सत्तांच्या तुलनेने इंग्रज हे समर्थ होते आपापसात भांडत बसलेल्या सर्व राज्यकर्त्यांना कंपनी सरकारने आपल्या वर्चस्वाखाली आणले. तथापि करवीरकरांच्या आरमाराने इंग्रज आणि पोर्तुगिज यांच्या हालचालींना कांही काळ पायबंद घातला होता. पेशवे आणि छत्रपती यांच्यातील कलहामुळे उभयतांनी इंग्रजांना मदतीसाठी

बोलाविले त्यामुळे इंग्रज हे परके असूनसुध्दा या दोघांना जवळचे वाटले आणि या परिस्थितीचा पुरेपूर इंग्रजांनी फायदा उठवून आपले आसन स्थीर केले. कोल्हापूर व इंग्रज यांच्यामध्ये इ.स. १८१२ साली एक तह झाला होता. या तहामुळे छत्रपतींच्या दोन गाद्यांचे प्रश्न इंग्रजांना समजले. इंग्रजांनी राज्यकारभार ताब्यात घेण्यापूर्वी प्रत्येक राज्यकर्त्यांचा इतिहास समजावून घेऊन प्रादेशिक इतिहास निर्माण केला. अशा रीतीने छत्रपतींच्या स्वतंत्र वृत्तीचा शेवट इंग्रजी राजवटीमुळे झाला. छत्रपतींच्यां-नंतर येणारे राज्यकर्ते केवळ कंपनी सरकारच्या मर्जीवर अवलंबून असल्यामुळे मर्यादित स्वरूपाचे स्वातंत्र्य कोल्हापूर संस्थानास प्राप्त झाले. १७१० ते १८२१ या कालखंडातील कोल्हापूर संस्थानच्या स्वतंत्र अस्तित्वाचा शेवट होऊन अखेर इंग्रजी अंमल सुरू झाला